**P.R.O Office, Crime Branch, Pimpri Chinchwad**
**Address :- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park, Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

**प्रेसनोट** **दिनांक – १८/०१/२०२५**

# अवैध सावकारांवर कडक कारवाई करणेचे पोलीस आयुक्तांचे आदेश

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध सावकारीची काही प्रकरणे निदर्शनास येत आल्याने अशा गुन्हेगारांच्या कृत्यांना आळा घालण्यासाठी श्री. विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी तात्काळ कडक कारवाई करण्याचे आदेश जारी केले आहेत.

महाराष्ट्र शासनाने अवैध सावकारी गुन्हेगारीच्या संकटाला आळा घालण्यासाठी, त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी, अधिक कडक आणि जरब बसविणाऱ्या तरतुदी असणारा विशेष कायदा ‘महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४’ हा अंमलात आणला आहे.

अवैध सावकारीच्या अनुषंगाने नागरीकांनी तक्रारी देणेस पुढे यावे म्हणुन जनजागृती मोहीम राबविणेबाबत तसेच नागरीकांकडुन भरमसाठ व्याजाने पैसे उकळणारे, नागरीकांना सदरबाबत छळ, धमक्या देणारे सावकारांविरुद्ध तात्काळ कठोर कार्यवाही करण्याचे आदेश सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना पोलीस आयुक्त यांनी दिले आहेत.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अवैध सावकारी किंवा भरमसाठ व्याज आकारणी करुन कोणी फसवणुक करत असेल तसेच तद्अनुषंगाने तक्रारदारास धमक्या किंवा छळाचा धोका असल्यास संबंधितांनी तात्काळ पिंपरी चिंचवड पोलीसांशी संपर्क साधावा.

**(जनसंपर्क अधिकारी)**
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय